सातारा जिल्हा परिषद सातारा
सामान्य प्रशासन विभाग
कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४ था मजला,सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कॅम्प,ता.जि.सातारा – ४१५००१
कार्यालय दूरध्वनी क्र. ०२१६२ - २९५०५३ Email- dyceogadstr@gmail.com

जा.क्र.जिपसा/साप्रवि/आस्था-1(2)/नि.सेनि/4247-4276/2023 दिनांक- 20.07.2023

**प्रति,**

1) सर्व खातेप्रमुख,------------------- जिल्हा परिषद सातारा.
2) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती---------------------
3) सर्व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती.------------------
4) सर्व तालुका वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती---------------.
5) सर्व उपअभियंता (जि.प.उपविभाग-बांधकाम / ग्रापापु/ लपावि) ------------.
6) सर्व वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र -------------
7) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.प्रकल्प--------------
8) मुख्याध्यापक, प्रतापसिंह हायस्कूल सातारा.

**विषय** - माहे जानेवारी 2025 ते डिसेंबर 2026 या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती यादी प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** - महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 118.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सातारा जिल्हा परिषदेकडील आगामी 2 वर्षामध्ये सन जानेवारी 2025 ते डिसेंबर 2026 पर्यंत नियम वयोमान प्राप्तीनुसार वर्ग 3 व 4 संवर्गामधील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी या पत्रान्वये प्रसिध्द करण्यात येत असून सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या ww.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये कर्मचाऱ्याचे नांव समाविष्ठ नसल्यास अथवा नाव, पदनाम, जन्मदिनांक व सेवानिवृत्ती दिनांक यामध्ये काही दुरुस्ती आढळून आल्यास दुरुस्तीबाबत या कार्यालयास दि. 31/07/2023 पर्यंत कळविण्यात यावे. सदर तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या दुरुस्त्या अथवा माहिती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच पंचायत समिती स्तरावरील आक्षेप एकत्रित करुन या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी.

तसेच सेवानिवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे व परिपूर्ण सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव संच विहीत नमुन्यामध्ये संबंधित सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्ती दिनांकाच्या सहा महिने अगोदर संबंधित कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविले जातील याबाबत सर्वतोपरी दक्षता घ्यावी. जेणेकरून सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभ संबंधित कर्मचाऱ्यास प्राधिकृत करण्याबाबतची पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**